CMYK

सुविचार
सातत्य हेच स्वप्नांना वास्तवात आणते

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com




पीएम धनधान्य योजनेचा पाच लाख शेतकऱ्यांना होणार फायदा
पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 157 ■ शुक्रवार ,दि. 18 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# धाराशिव नगर पालिकेत नेमका किती भ्रष्टाचार..? आता विशेष लेखा परीक्षण, यलगट्टे आणि फड यांच्या कार्यकाळातील कारभाराची होणार पोलखोल

## निवडणुकीच्या तोंडावर नगर पालिकेच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणात सरकारचा महत्वाचा निर्णय

**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव नगर पालिकेच्या इतिहासात २०२० ते २०२२ आणि त्यानंतर अनेक भ्रष्टाचार झाले असून, या एकूण प्रकरणाची पोलखोल होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. अनेकवेळा तक्रारी करूनही तपासात अपेक्षित गती मिळत नव्हती. पोलीस विभागामार्फत नेमलेल्या एसआयटीकडून आलेल्या शिफारसीनुसार,आमदार सुरेश धस आणि जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार स्थानिक निधी लेखा परीक्षण संचालनालयाने नगर पालिकेतील कथित भ्रष्टाचार प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी स्थानिक लेखापरीक्षण सहसंचालकामार्फत लेखापरीक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. या लेखा परीक्षणानंतर नगर पालिकेत नेमका किती कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे, हे स्पष्ट होणार आहे.

तत्कालीन मुख्याधिकारी हरी कल्याण यलगट्टे आणि वसुधा फड यांच्या कार्यकाळात नगर पालिकेत अनेक भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी करण्यात आहेत. या एकूण भ्रष्टाचाराची चौकशी मात्र केली जात नव्हती. आमदार




सुरेश धस यांनी गेल्या चार वर्षापासून हा मुद्दा विधान परिषद आणि विधानसभेत लावून धरला आहे. त्यांच्या या मागणीवरून ६ महिन्यापूर्वी पोलीस विभागामार्फत (एसआयटी) विशेष तपास पथकाची नेमणूक करण्याचे पोलीस म



हासंचालकांनी आदेश दिले होते. आदेशानुसार तत्कालीन पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी विशेष तपास पथक नेमले. मात्र या पथकाने स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागामार्फत लेखा परीक्षण करण्याची शिफारस केली होती. त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी नगरपालिकेतील एकूण कामांची चौकशी करण्यासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षण संचालनालयाला पत्र दिले होते. त्यात स्थानिक निधी लेखापरीक्षण कार्यालयामार्फत २०२० ते



२०२२ या काळातील लेखा परीक्षण करण्याची विनंती संचालनालयाकडे करण्यात आली होती. त्यावर आमदार सुरेश धस यांनीही सरकारकडे स्थानिक निधी लेखापरीक्षण कार्यालयामार्फत नगरपालिकेतील लेखापरीक्षण व्हावे, अशी मागणी केली होती. या मागणीनुसार बुधवारी स्थानिक निधी लेखापरीक्षण संचालनालयाने यासंदर्भातील आदेश जारी केले असून, छत्रपती संभाजी नगर येथील प्रादेशिक स्थानिक निधी लेखा परीक्षण सहसंचालक कार्यालयाला

### संचालनालयाने सहसंचालकांना दिले आदेश

धाराशिव नगरपरिषद अंतर्गत कोट्यावधी रूपयांच्या घोटाळ्याप्रकरणी विशेष लेखापरीक्षणास मंजूरी देतानाच पत्रात म्हटले आहे की, आमदार सुरेश धस आणि जिल्हाधिकारी धाराशिव यांनी धाराशिव नगर परिषदचे माहे जुलै २०२० ते २३ डिसेंबर २०२२ या कालावधीचे विशेष लेखापरीक्षण करणेबाबत संचालनालयास विनंती केली आहे. त्यानुषंगाने मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम ३ (इ) व मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्ष नियम १९३१ मधील नियम १५ च्या तरतुदी विचारात घेऊन आपणास सदरील लेखा परीक्षणचे आदेश देण्यात येत आहेत.

### कधी होणार लेखा परीक्षण..?

सदर विशेष लेखापरीक्षण २०२३-२०२४ चे जिल्हा परिषद व पंचायत समितीचे नियमित लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रथम प्राधान्याने हाती घेण्यात यावे, असे संचालनालयाने म्हटले आहे.

तसे आदेश दिले आहेत.त्यामुळे २०२० ते २३ डिसेंबर २०२२ या कालावधीतील तसेच मुख्याधिकारी वसुधा फड यांच्या कार्यकाळातील विशेष लेखा परीक्षण करण्यात

### दोन्ही मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील परीक्षण

आमदार सुरेश धस यांच्या तक्रारीनुसार धाराशिव नगर परिषदेतील गैरकारभाराच्या सदंर्भात (कालावधी ६ जुलै २०२० ते तत्कालीन अधिकारी हरीकल्याण यलगट्टे व वसुधा फड यांचा कार्यकाल) जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी सादर केलेल्या प्राथमिक अहवालातील मुद्द्यांच्या अनुषंगाने माहे जुलै २०२० ते २३ डिसेंबर २०२२ या कालावधीचे विशेष लेखापरीक्षण सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, धाराशिव यांचेमार्फत करणेस मान्यता देण्यात येत असल्याचे संचालयनाने म्हटले आहे. वास्तविक पाहता २३ डिसेंबर २०२२ रोजी यलगट्टे यांचे निलंबन झाले होते. त्यानंतर वसुधा फड यांनी पदभार स्वीकारला. उल्लेख केलेल्या तारखेमध्ये फड यांचा कार्यकाळ येत नसला तरी लेखापरीक्षण संचालनालयाच्या आदेशानुसार फड यांच्या कार्यकाळातील देखील विशेष लेखापरीक्षण होणार आहे.

येणार आहे.त्यामुळे यलगट्टे यांच्या कार्यकाळात आणि फड यांच्या कार्यकाळात नेमका किती कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे, याचा उलगडा होणार आहे.

# खासदार ओमराजे निंबाळकर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## रक्तदान, गरजूंना मदतीचा हात आणि वंचितांसोबत वाढदिवसाचा आनंद





**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे जनतेचे प्रतिनिधी खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांचा वाढदिवस गुरुवारी (दि.१७) समाजाभिमुख उपक्रमांनी साजरा करण्यात आला. 'नेतृत्व हे केवळ पद नसून सेवा' हे तत्त्व पाळत राजेनिंबाळकर यांच्या कार्यशैलीला अनुसरून शिवसेना व युवासेनेच्या वतीने विविध उपक्रमांची प्रभावी रचना करण्यात आली होती. यावेळी धाराशिव शहरातील खासदार संपर्क कार्यालयात आयोजित रक्तदान शिबिरास नागरिक, तरुण, कार्यकर्त्यांनी मोठा प्रतिसाद दिला. जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा भासत असल्याने वाढदिवसानिमित्त या शिबिराचे आयोजन केले गेले. अनेकांनी 'वाढदिवसाचा खरा अर्थ समाजासाठी योगदान' या भावनेतून रक्तदान केले. त्यानंतर धाराशिव येथील अंकुर शिशूगृहातील निराश्रित मुलांसोबत केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी धाराशिव-कळंब विधानसभा अध्यक्ष शौकतभाई शेख यांच्या हस्ते संस्थेला २१ हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. या उपक्रमात माणुसकीचा जिव्हाळा प्रकर्षाने जाणवला. शहरातील शासकीय स्त्री रुग्णालयात १७ जुलै रोजी जन्मलेल्या बालकांना खास ड्रेस देण्यात आले, त्यांच्या मातांना साडी-चोळी आणि खाऊ वाटण्यात आले. मातृत्वाचा सन्मान आणि नवजात बालकांचा आनंद या उपक्रमात प्रतिबिंबित झाला. या सर्व कार्यक्रमांमध्ये शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरी समाज मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या कार्यक्रमास उपजिल्हा प्रमुख विजय सस्ते, जिल्हा सचिव प्रविण कोकाटे, युवासेना जिल्हाप्रमुख रवि वाघमारे, जिल्हा समन्वयक दिनेश बंडगर, धाराशिव शहरप्रमुख सोमनाथ गुरव,अतिश पाटील, युवासेना तालुका प्रमुख राकेश सुर्यवंशी, नगरसेवक बाळासाहेब काकडे, रोहित निंबाळकर, तुषार निंबाळकर, सिध्देश्वर कोळी, राणा बनसोडे, रवि कोरे आळणीकर,निलेश शिंदे, सुनिल वाघ, युवासेना शहरप्रमुख अभिजित कदम, उपशहरप्रमुख बंडू आदरकर,दिपक जाधव,जावेद काझी, विधान सभा अध्यक्ष शौकत शेख,मनोज उंबरे,अकबर कुरेशी, अमित उंबरे, ॲड. मनोज शेरकर यांच्यासह शिवसैनिक पदाधिकारी आदींचा समावेश होता.

# इच्छुक उद्योजकांकडून 'तारा' प्रकल्पासाठी इओआय मागवणार

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती



**आरंभ मराठी | धाराशिव**

जिल्ह्याचा आर्थिक चेहरा- मोहरा बदलत शेतकरी व युवकांना न्याय देणारा 'तारा' अर्थात तुळजाई शेती उत्पन्न वृद्धी प्रकल्प या एकत्रित शेतकरी उत्पन्न वृद्धी प्रकल्पा अंतर्गत गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना आता EoI द्वारे प्रकल्पात सहभागी होण्याची संधी उपलब्ध केली जाणार असल्याची माहिती आमदार तथा मित्रचे उपाध्यक्ष राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. शेतमालावर प्रक्रिया करून मूल्यवृद्धी करणे, वेअरहाऊस, कोल्ड स्टोरेजची सुविधा निर्माण करणे, कृत्रिम किंवा वनस्पती-आधारित स्त्रोतांपासून व्हेगन लेदर ची निर्मिती करणे, Compressed Bio Gas ची निर्मिती करणे, तसेच MSME Park च्या माध्यमातून छोट्या उद्योजकांना देखील या प्रकल्पात गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे अपेक्षित आहे. तारा प्रकल्पाच्या प्रस्तावित माळूंब्रा (ता. तुळजापूर) येथील १२०० एकर जागेची उपलब्धी ही मोठी बाब आहे. राष्ट्रीय महामार्गालगतचे स्थान, जवळून जाणारी रेल्वेलाइन, २२० kV चे सबस्टेशन आणि पाण्याची मुबलकता पाहता उद्योजकांसाठी हा योग्य पर्याय ठरणार आहे.या प्रकल्पाच्या अनुषंगाने तुळजापूर येथे आयोजित आढावा बैठकीमध्ये मिचे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी EoI बाबत सूचना दिल्या आहेत. सदर बैठकीस मित्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार तसेच सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# एस एस मोबाईल शॉपी फोडणारा वडगाव लाख येथील आरोपी चोवीस तासात ताब्यात

**आरंभ मराठी | तुळजापूर**


तुळजापूर शहरात पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या एस एस मोबाईल शॉपीच्या दुकानात प्रवेश करून छत फोडून १३ लाख ३३ हजार ५९१ रुपयायांच्या आय फोन मोबाईल चोरी प्रकरणी तुळजापूर तालुक्यातील वडगाव लाख येथील एका आरोपीस पोलिसांनी अटक केली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. तुळजापूर शहरातील पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या शहरातील एस एस मोबाईल शॉपी या दुकानाची दिनांक १४ जुलै रोजी चोरट्यांनी आय फोन कंपनीचे मोबाईल चोरून नेल्याची मोबाईल शॉपी चे मालक सचिन शिंदे यांनी पोलीसांत तक्रार दाखल केली होती. यासंदर्भात तुळजापूर पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेव मड्डेरेड्डी यांच्या टिमने चोवीस तासाच्या आत चोराच्या मुसक्या आवळल्या. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता चार दिवसांसाठी पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# जबड्याची किचकट शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात डॉ. कृष्णा उंद्रे-देशमुख यांना यश

## जिल्हा रुग्णालयात तीन तास शस्त्रक्रिया, रुग्णाकडून डॉक्टरांचे आभार

**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील कामेगाव येथील रुग्ण दुचाकीवरुन पडून गंभीर जखमी होवून त्याचे जबडा व त्याखालील सर्व दात पुर्णत: निकामे झाले होते. अशा अवस्थेत हा रुग्ण जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल झाला होता. विशेष म्हणजे रक्त थांबत नव्हते,जबड्याची ही किचकट शस्त्रक्रिया करणे हे डॉक्टरांसाठी जिकरीचे काम होते. मात्र एमडीएस ओरल सर्जन डॉ. कृष्णा उंद्रे-देशमुख यांनी सदरील रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया करत यश संपादन केले आहे. तब्बल तीनतास ही शस्त्रक्रीया चालली. रुग्ण उपचार पुर्ण करुन तंदुरुस्त होवून आपल्या घरी सुखरुप पोहचला. त्यामुळे रुग्णांसह रुग्णाच्या नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयातील डॉ. उंद्रे व त्यांच्या सर्व टिमचे आभार मानले आहेत. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, कामेगाव येथील हनुमंत वेजिनाथ कदम (वय ४५) हे दुचाकीवरुन




पडून त्यांच्या जबड्यास मोठा मार लागला होता. यामध्ये एक शिरही तुटली होती. खालच्या बाजुचे दात सर्व खिळाखिळा झाले होते. तसेच जबडाही आतील बाजूस सरकला होता. यामुळे रक्तस्त्राव जोरात सुरु होता. अशा अवस्थेत हे ६ जुले २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात दाखल झाले होते. अपघात घडल्यापासून दुपारी ४ ते रात्री ११ वाजेपर्यंत रक्तस्त्राव चालू राहिल्याने रुग्णांची प्रकृती विक झाली होती. त्यामुळे डॉक्टरांपुढे रुग्णांवर शस्त्रक्रीया करणे आव्हान होते. मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. शैलेंद्र चौहान तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कृष्णा उंद्रे-देशमुख, असिस्टेंट डॉ. नागेश वाघमारे, भूलतज्ञ डॉ उज्मा आणि त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रीया यशस्वी केली. रविवारी ही घटना घडली होती. त्यामुळे डॉक्टर असतील का नाही, अशी शंका मागील काही अनुभवावरुन होती. मात्र रविवार असतानाही माहिती कळताच डॉ. उंद्रे-देशमुख हे तात्काळ हजर राहिले. त्यांनी रुग्णावर तात्काळ उपचार सुरु केले. हादेखील जिल्हा रुग्णालयातील बदल झाल्याचे यावेळी दिसून आले. रुग्णांचा रक्तस्त्राव थांबत नव्हता, रात्री १ वाजता रक्तस्त्राव थांबवण्यात त्यांना यश मिळाले. त्यानंतर उपचार करत सोमवारी (दि.१४) रुग्णांवर शस्त्रक्रीया करण्यात आली. ३ तास ही शस्त्रक्रीया चालली. आता रुग्ण पुर्वस्थितीत दिसत असून बुधवारी (दि.१६) रुग्ण हनुमंत कदम हे डिस्चार्ज घेवून घरी पोहचले आहेत.

# इयत्ता अकरावीचे नियोजन ढासळले; विद्यार्थ्यांना कॉलेज सुरू होण्याची प्रतीक्षा

## आतापर्यंत प्रवेशाची एकच फेरी पूर्ण ;कॉलेजकडून विद्यार्थ्यांची लूट सुरुच

**आरंभ मराठी | धाराशिव**

इयत्ता दहावीचा बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर होऊन दीड महिना उलटून गेला. पण अजूनही अकरावीचे वर्ग सुरू झालेले नाहीत. सध्या सुरू असलेली प्रवेश प्रक्रिया संथगतीने सुरू असून, विद्यार्थी व पालक मोठ्या संभ्रमात असून त्यांची घालमेल सुरू आहे. त्यातच प्रवेश घेताना कॉलेजकडून विद्यार्थ्यांची लूट सुरूच आहे. शिक्षण विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे हजारो विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालय सुरू होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राज्यभर एकाच पद्धतीने सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. धाराशिव जिल्ह्यात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठी जिल्ह्यातील



११७ कनिष्ठ महाविद्यालयांतील २८ हजार जागांसाठी प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. यासाठी दहावी पास झालेल्या १६ हजार ५५५ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केलेली आहे. आतापर्यंत प्रवेशाची पहिली फेरी पूर्ण झाली असून, यात ५ हजार २३३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. प्रवेशाची दुसरी फेरी सुरू असून त्याची गुणवत्ता यादी कालच प्रसिद्ध झाली. त्यानंतर आजपासून (दि.१८) ते २१ जुलै दरम्यान दुसऱ्या फेरीचे प्रवेश होणार आहेत. यानंतर प्रवेशाच्या दोन फेऱ्या अद्याप बाकी आहेत. शाळा-महाविद्यालये शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासाठी सज्ज असली तरी शासकीय यंत्रणा मात्र गोंधळलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, त्यांचा अकरावीचा

### अतिरिक्त फीच्या मुद्द्यावर केवळ तोंडी, आदेश लेखी आदेश नाहीच

इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याच्या घटना समोर येत आहेत. ऑनलाइन पोर्टलवर शून्य फिस दाखवून प्रत्यक्ष प्रवेश घेताना मात्र विद्यार्थ्यांकडून तब्बल १२ हजार रुपये कॉलेज कडून वसूल केले जात आहेत. यासंबंधी 'दैनिक आरंभ मराठी'ने वृत्त देऊन हा प्रश्न समोर आणला होता. त्यानंतर शिक्षणाधिकारी (मा.) सुधा साळुंके यांनी जास्त फी घेणाऱ्या कॉलेजवर कारवाई करणार असल्याचे सांगितले होते. मात्र शिक्षण विभागाने अजूनही लेखी पत्र काढून कॉलेजला समज दिलेली नाही. त्यामुळे या प्रकाराला शिक्षण विभागाची मूक संमती आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रवेश प्रक्रियेस झालेला उशीर त्यातच विद्यार्थ्यांची होत असलेली आर्थिक पिळवणूक यांमुळे विद्यार्थ्यांसह पालकांना देखील याचा त्रास होत आहे.

अभ्यासक्रम रखडणार आहे. अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा आणि वेळेचे नियोजन कसे करायचे याबाबत अजूनही निर्णय होत नाही. त्यामुळे शिक्षण यंत्रणा व विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी अवस्थेत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी वाढत असून, वेळेत वर्ग न सुरू झाल्यास शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. शिक्षण विभागाने तत्काळ योग्य पावले उचलून वर्ग सुरू करावेत, अशी मागणी पालक व शिक्षक वर्गातून होत आहे.

# दूषित चारा व पाण्यामुळे तीन शेतकऱ्यांच्या १६ शेळ्या दगावल्या



**आरंभ मराठी | ईट**

भूम तालुक्यातील ईट येथील शेतकरी जवळच्या शिवारात शेळ्या चारत असताना दूषित पाणी व दूषित चारा खाल्ल्याने १६ शेळ्या जाग्यावरच मृत्युमुखी पडल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि.१७) घडली. शेतकऱ्यावर अचानक पणे आलेल्या संकटामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, ईट येथील शेतकरी बाबू शिंदे, मदन शिंदे व भाऊ शिंदे हे तिघेजण आपल्या जवळपास ७० शेळ्या चारण्यासाठी गेले होते. संगमेश्वर प्रकल्पांनजीक ईदरूपा नदीवर तिघेजण शेळ्या चारण्यासाठी गेले असता, शेळ्यांनी दूषित पाणी पिले व दूषित चारा खाल्ला. त्यामुळे ७० शेळ्यापैकी १६ शेळ्यांना बाधा झाली. त्यामुळे शेतामध्येच १६ शेळ्या जागेवर मरण पावल्याची घटना घडली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, तीन शेतकऱ्यांचे यामुळे जवळपास दोन लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

# भूम आठवडी बाजारात चोरांचा सुळसुळाट; मोटारसायकलची चोरी

**आरंभ मराठी | भूम**

भूम शहरातील आठवडी बाजारात चोऱ्यांचे प्रमाण वाढत असून मोटारसायकल चोरी करणारी टोळी सध्या सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. सततच्या होत असलेल्या वेगवेगळ्या चोऱ्यामुळे बाजारात येणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भूम येथील आठवडी बाजारात ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक येतात. बाजारकरू आपल्या दुचाकी मोटारसायकली गवळी घर परिसर ते माऊली ऑफसेट या भागात लावून बाजारात खरेदीसाठी जातात. गुरुवारी (दि.१७) नवलगाव येथील युवक पाच वाजन्याच्या सुमारास आठवडी बाजारामध्ये (एच. एफ. डिलक्स एम. एच. २५ झेड ३९१६) गाडी लावून बाजारात गेला होता. परत येईपर्यंत त्याची गाडी चोरट्यानी लंपास केल्याची घटना घडली. अलीकडच्या काही आठवड्यांपासून या भागात वाहन चोरीचे प्रकार वाढले असुन, मोटारसायकलसह मोबाईल व पर्स चोरीच्या घटनाही घडत आहेत. चोरींच्या घटना थांबवण्यासाठी पोलिस प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे.

CMYK

# पिल्लं मोठी होतात, दूर दूर जातात, घरटं होतं भकास, आईला त्यांच्या परतण्याची आस!

**आरंभ** मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार, काव्यारंभचे हे चोविसावे पुष्प मी पूर्वाश्रमीची जयश्री दिनकर वाघमारे व आत्ताच्या सौ. जयश्री तुकाराम फुटाणे यांच्या कवितांनी गुंफणार आहे. त्यांचे शिक्षण एम. ए. बी .एड् झालेले आहे राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर वार्षिक अंक शब्दगंध मध्ये प्रलय ही त्यांची पहिली कविता १९९८– ९९ मध्ये प्रकाशित झाली होती. अक्षरवेल महिला साहित्य मंडळ धाराशिव यांच्या अंकुर दिवाळी अंकात ज्येष्ठ साहित्यिक कवी ना.धों.महानोर आणि जैत रे जैत सिनेमा हा लेख प्रकाशित तसेच अंकुर दिवाळी अंकात संन्यस्त स्वामिनी अहिल्याबाई होळकर हा लेख प्रकाशित आहे.सावित्रीच्या कविता हा त्यांचा प्रातिनिधीक काव्यसंग्रह प्रकाशित आहे. आत्मजा हा त्यांचा कवितासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे.अक्षरवेल महिला साहित्य मंडळ धाराशिवच्या विशाखा साहित्य संमेलनामध्ये त्यांनी काव्यवाचन सूत्रसंचालन केले आहे तसेच लेखिका साहित्य संमेलन उदगीर येथे काव्यवाचन केले आहे. अक्षरवेल महिला साहित्य मंडळ धाराशिवच्या त्या ग्रंथविभाग प्रमुख आहेत.त्यांच्या आत्मजा या पहिल्याच काव्यसंग्रहातील कविता आपल्याला चिंतन करायला भाग पाडतात.आपल्या स्वत्व या कवितेत त्या म्हणतात,काहीतरी शोधतेय ती.. काय हरवलंय तिचं ? बहुधा स्वत्व ! आणि मग ते हरवलेल स्वत्व कवयित्री खूप ठिकाणी शोधते आणि ते शेवटी तिच्याच जवळ सापडतं! आणि त्या स्वत्वासोबत तिचा विश्वास उफाळून येतो.तशीच कवयित्रीची पणती होऊ*चल ही पण सुंदर कविता आहे.जमणार नाही जरी सूर्य होणे मला, पणती होऊ चलअज्ञानाच्या तमाला थोडे उजळू चल किती सच्ची भावना आहे. थोडे आपल्या परीने काम करून या जगातला अज्ञानाचा अंधःकार कवयित्री दूर करू पाहात आहे.तर पिल्लं या कवितेत ती मुलांच्या आठवणीत व्याकुळ होऊन लिहिते,पिल्लं मोठी होतात, दूर दूर उडून जातात, घरटं होतं भकास आईच्या डोळ्यांना त्यांच्या परतण्याची आस! तर बाबा या कवितेत कवयित्री आपल्या पित्याच्या आठवणीने व्याकुळ होते म्हणते,तुझ्यावाचून सावली देखील पोळतेय तुझ्यावाचून घर वाटत नाही घरासारखे बाबा! आपल्या वय झालंय असं म्हणायचं नाही या कवितेत मात्र ती थोड़ी मिश्किल होते आणि सर्व जेष्ठ मंडळींना बजावते की सुख शोधायचं प्रत्येक गोष्टीत आपलंच तुणतुणं वाजवायचं नाही! अशा या वेगवेगळ्या ढंगाच्या कवितांचा आपण रसास्वाद घेऊ या.



डॉ. रेखा अनिल ढगे

काव्यारंभ

## वय झालंय असं म्हणायचं नाही

वय झालंय असं म्हणायचं नाही...
उगाच छोट्या मोठ्या दुखण्यांना
गिणायचं नाही वय झालंय असं
म्हणायचं नाही......

गरज ओळखून काळाची पुढच्या
पिढीला द्यायचं प्रोत्साहन, उगाच
पाय मागे ओढायचा नाही, वय
झालंय असं म्हणायचं नाही

अमकं केलं, तमकं केलं, मीच केलं
,आमच्या काळी असं नव्हतं, असंच
होतं.. तोच तो पाढा गिरवायचा नाही
वय झालंय असं म्हणायचं नाही...

हेच हवं, तेच हवं, असंच हवं उगाच
नाटक करायचं नाही
वय झालंय असं म्हणायचं नाही

सुख शोधायचं प्रत्येक गोष्टीत
आपलंच तुणतुणं वाजवायचं नाही वय
झालंय असं म्हणायचं नाही...

माझं काय आता ?

पिकलं पान, गळेल केव्हा कळायचं
नाही... हा तर डायलॉग मारायचाच
नाही. वय झालंय असं म्हणायचं
नाही...

अनुभवाची शिदोरी वाटत राहायचं
नातू, पणतू यांच्यासाठी वात व्हायचं
दिव्यातली तापलं, पोळलं म्हणून
कण्हायचं नाही वय झालंय असं
म्हणायचं नाही...
कवळी काढून स्वच्छ घासायची,
गालावरची खळी हास्यासवे जपायची
पण ,वय झालंय असं म्हणायचं
नाही....

मुलांना द्यायचा धीर, सुनाना द्यायचा
आधार, नातवंडांचा व्हायचा आरसा

विचार करायचा नाही फारसा वय
झालंय असं म्हणायचं नाही....
डोळ्यांतली चमक, मनगटातली
धम्मक दाखवत राहायचं अधून
मधून नडतं बरंच काही माझ्या
वाचून, हे माहीत असून देखील
दाखवायचं नाही वय झालंय असं
म्हणायचं नाही...

सामावून घ्यायचं सर्वांना, सागर
व्हायचं मोठा उगाच लुडबूड त्यांना
अडथळा अन् स्वतःला ओझं होईल
इतकं गुंतायचं नाही वय झालंय
असं म्हणायचं नाही...

खळखळून हसायचं, मनमुराद
बोलायचं आयुष्याचं सोनं करायचं
कधी साखर तर कधी मीठ व्हायचं
जीवनाचा आनंद हळूहळू घेत
रहायचं
मित्र, परिवार यांच्यासाठी वेळ
मात्र काढायचा, वय झालंय असं
म्हणायचं नाही...

कुपि होऊन अत्तराची हवेत अलगद
दरवळत राहायचं वय झालंय असं
म्हणायचं नाही...

आयुष्याच्या इंद्रधनुत अलगद
रंगून जायचं पण वय झालंय असं
म्हणायचं नाही पण वय झालंय असं
म्हणायचंनाही!!

## १४. पणती होऊ चल

जमणार नाही जरी सूर्य होणे मला
पणती होऊ चल ... अज्ञानाच्या
तमास थोडे उजळू पाहू चल पणती
होऊ चल....

घास थोडे थोडेच पूस लख्ख
कर मनाचा गाभारा सद्विचार अन्
सद्वर्तनाची ज्योत निरंतर तेवत ठेवू
चल पणती होऊ चल.....

थोडे अडव थोडेच जिरव
नडला त्याला साथ दे पडला त्याला
हात दे हासून बोल बोलून हास
हास्याचे फुगे फोडू चल पणती होऊ
चल...

क्षणभंगुर या जीवनी सोबत येणार
नाही काही 'अहंपणाची' कागदी
होडी पाण्यात सोडू चल पणती
होऊ चल..... चल पणतीहोऊ........

## स्वत्व

काही तरी शोधतेय ती.... काय
हरवलंय तिचं...? बहुदा... 'स्वत्व'
!

माहेराच्या अंगणात, परसबागेत,
कुठे ??

घराच्या कौलांवर.. कुठे?? शोधतेय
ती तिचं तिलाच कळत नाही कुठे
हरवलंय तिचं स्वत्व

शाळेच्या वर्ग खोल्यात की,
खेळाच्या मैदानावर, की कॉलेजच्या
विषय तासिकेत ? ग्रंथालयात की,
त्या रस्त्यावर जिथून ती निघाली
होती वेडी वाकडी वळणे घेत तर
कधी धोपट पायवाट तुडवीत

कुठे ... कुठे ??

हरवलंय तिचं स्वत्व??

सासरच्या चार भिंतीत की, त्या
खिडकीत जिथून ती बाहेरचं जग
पाहण्याचा प्रयत्न करायची जाळीदार
खिडकी, पडदे, भिंती की त्या
वापरून जीर्ण झालेल्या कपड्यांच्या
गाठोड्यात
गाठोड्यात तर नाही ना तिचं स्वत्व
?

काहीतरी शोधतेय ती काय हरवलंय
ते तिचं तिलाच कळत नाही.

तिला मदत ही नकोय कोणाची ह्या
शोधात कारण तिचा विश्वास आहे
खोल कुठेतरी दबा धरून बसलेला
तिचा विश्वास नकळत एक दिवस
उफाळून वर येईल स्वत्वा सोबत !

एक दिवस तिचा शोध विजयपताके
सोबत फडकून थांबेल तेव्हा ती
स्वत्वाला मिरवेल ..

स्मित करत म्हणेल मी जे इकडे
तिकडे शोधत होते ते कधी हरवलेच
नव्हते ते मला चिकटूनच होते आणि
मी त्याला वेगळं करून शोधत होते
मी त्याला वेगळं करून शोधत होते.

## पिल्लं ...

जेव्हा मोठी होतात घरटं सोडून
निघून जातात आठवणींचा पसारा
पसरून उडून जातात

वास्तू आणि वस्तू व्यापून टाकतात
आठवणी पिल्लं जेंव्हा मोठी होतात

पिल्लं.... कितीही मोठी होवोत
काळं, गोरं, शेबडं, नकटं, मुल
कसेही दिसो न चुकता तीट रोज
त्यांना लावते कानशिलावर चार बोटं
मोडते त्यांच्यासाठी देवाकडे मागणं
मागते रोज

पिल्लं मोठी होतात दूर दूर उडून
जातात घरटं होतं भकास आईच्या
डोळ्यांना मात्र त्यांच्या परतण्याची
आस.
बालपण आठवून पिल्लांचे आई
गोंजारत बसते अदृश्य पाश मायेचे...
पाणावलेल्या डोळ्यांना हलकेच
वाट देते.

हातातून निसटलेला कापूस पुन्हा
हाती घेते वातीला पीळ देते ..

आईवर शेवटी एकटं राहण्याची वेळ
येते आईवर शेवटी एकटं राहण्याची
वेळ येते पिलांच्या आठवणीत

## बाबा

चार भिंती घराच्या असते आई अन्
मजबूत छप्पर असतो बाबा उन,
वारा, पाऊस, गारा झेले सारेच
कुटुंबासाठी बाबा

काटेरी दिसे वरवर आतुन गोड
रवाळ गर बाबा

ना कशाची फिकिर ना कशाची
तमा तु असता जवळ बाबा असता
सोबत बाबा संकटं होतात खुजी
अन् आकाशाला कवेत घेतात
स्वप्ने माझी

नाहीस तु बाबा हे सत्य नाकारता
येत नाही उणिव तुझी आश्वस्त जगू
देत नाही बाबा
येशिल का पुन्हा नवा जन्म घेवून
बाबा
होशिल नं माझा पुन्हा बाबा

एक फुलपाखरू उडायचं म्हणतयं,
एक नाव तरायची म्हणतेय.... बाबा

तुझ्या वाचून सावली देखिल
पोळतेय, तुझ्या वाचून वाटत नाही
घर देखिल घरासारखे बाबा

भरवशाची आमची तु छत्री तुझ्या
विना कशाची नाही खात्री बाबा

असे का गेलात पोरकं आम्हाला
केलात बाबा

बाळांना माझ्या गिरका अन् धनुष्य
बनवून देणार आता कोण बाबा ?

विमान अन् जहाज त्यांचं त्याच
काय होणार बाबा
सांग ना गं आई देवाघरून आजोबा
कधी येणार? या प्रश्नाचे उत्तर
सांगा मी काय देणार!

नातवंडां सोबत खेळायचं... गप्पा
गोष्टी करायच्या....

आमचं केल सर्व, थोडं आम्हालाही
तुमच्यासाठी करु द्याचंत नं बाबा

स्वप्न तुमची डोळ्यांनी आमच्या
पाहुन तरी घ्यायचीत नं बाबा..







जयश्री फुटाणे

# देवा तुझा मी सोनार..

**हिंदू** धर्म किंवा प्राचीन काळापासून चालत आलेला वैदिक धर्म यामध्ये अगदी सुरुवातीपासूनच अनेक पंथ चालत आलेले आहेत. सर्व पंथ वेदांनाच प्रमाण मानत असले तरी त्यामध्ये काही मत भिन्नता असलेली दिसून येते. ही मत भिन्नता कधीकधी इतकी प्रखर झालेली दिसते की त्यांच्यामध्ये संघर्षही झालेला दिसून येतो. वैदिक धर्मामध्ये शैव आणि वैष्णव असे दोन मुख्य प्रवाह आहेत. त्यासोबतच शाक्य (देवीचे पूजक) , स्मार्त पंथ(जे ईश्वराची अनेक रूपे मान्य करतात) आणि वैदिक संप्रदाय ( ईश्वराचे निर्गुण, निराकार रूप मानणारे) हेही पंथ आहेतच. सद्यस्थितीत यामध्ये फार कट्टर वाद विवाद होत नसले तरी इतिहासात असे टोकाचे वाद झाल्याचे संदर्भ आहेत. जे लोक शैव पंथाला मानतात म्हणजे भगवान शंकराचे भक्त आहेत ते भगवान विष्णूच्या कोणत्याही रूपाचे दर्शन सुद्धा घेत नसत. तसेच वैष्णव पंथीय लोक जे भगवान विष्णूचे पूजक आहेत ते शिवाची भक्ती पूजा करत नसत.आज आपण संत नरहरी सोनार यांचा एक अभंग रसग्रहणासाठी घेणार आहोत इयत्ता सातवी बालभारती मराठी विषयाच्या अभ्यासासाठी प्रस्तुत अभंग दिलेला आहे.



राम आरडले
९४२३८२७२३६


अशी बोलते कविता

विद्यार्थ्यांना हा अभंग शिकवत असताना संत नरहरी सोनार यांच्या विषयी माहिती सांगणे गरजेचे आहे. संत नरहरी सोनार हे संत ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ, मुक्ताबाई, संत नामदेव यांचे समकालीन असल्याचे काही अभंगांमधून दिसून येते. संत नरहरी सोनार यांना एकूण ९२ वर्षाचे दीर्घायुष्य लाभले. यावेळी संत ज्ञानेश्वर १२ वर्षाचे तर संत नामदेव हे ४२ वर्षाचे असल्याचे उल्लेख आहेत. संत नरहरी सोनार हे पंढरपूर येथील रहिवासी होते किंबहुना त्यांच्याच पूर्वजांनी पंढरपूर नगर वसवल्याचेही सांगितले जाते. ते व्यवसायाने सोनार होते. सुरुवातीच्या काळात ते कट्टर शिवभक्त होते. त्याकाळी शैव आणि वैष्णव असा वाद अगदी टोकाला गेलेला होता संत नरहरी सोनार हे एक कट्टर शिवभक्त होते. ते विठ्ठलाच्या मूर्तीचे तोंडही पाहत नसत. एकदा एका सावकाराने त्यांना विठ्ठलासाठी सोन्याचा कंबरपट्टा बनवण्यासाठी सांगितले. नरहरी सोनार यांनी अंदाजे तो पट्टा बनवून पाठवला. पण तो मोठा झाला. त्यांनी तो कमी करून दिला तरीही तो आणखी मोठाच झाला. असे अनेक वेळा झाल्यावर त्या सावकाराने नरहरी सोनार यांना स्वतः विठ्ठलाच्या कमरेचे माप घेण्याची विनंती केली. यासाठी अगोदर त्यांनी नकार दिला पण खूप आग्रहानंतर डोळ्यावर पट्टी बांधून ते मंदिरात आले. आणि ते माप घेऊ लागले. त्यांनी कमरेला हात लावला तेथे वाघाचे कातडी चे वस्त्र असल्याचे जाणवले. गळ्याला हात लावला तर तेथे नाग असल्याची जाणवले. हात, पाय व इतर ठिकाणी हात लावल्यानंतर त्यांना शिवाची पिंड हाताला लागली यावरून स्वतः विठ्ठलानेच त्यांना शिव आणि विष्णू हे एकच आहेत हे दाखवून दिले आणि त्यानंतर संत नरहरी सोनार हे विठ्ठलाचे भक्त बनले.

अशी कथा सांगितली जाते. त्यानंतर शिव आणि वैष्णव यांच्यातील वाद मिटवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. किंबहुना यासाठीच त्यांचा जन्म झाला असेही म्हटले जाते. संत नामदेवांनी त्यांना शिवानी वैष्णव यांच्यात भेद करू नये असा सल्ला दिला होता पण प्रत्यक्ष अनुभवानंतरच त्यांनी तो मानला. देवा तुझा मी सोनार , तुझे नामाचा व्यवहार असा अभंग त्यांनी रचला त्यांच्या अनेक अभंगांमधून सोनार व्यवसायाची रूपके , दाखले देताना दिसतात. अनेक जातीपंथाच्या संतांच्या अभंगांमधून आपल्याला त्या–त्या व्यवसायाची रूपके, दाखले आढळतात. आम्ही वारिक वारिक करू हजामत बारीक किंवा कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी , जोहार मायबाप जोहार अशी अनेक उदाहरणे आहेत. प्रस्तुत अभंगात संत नरहरी सोनार यांनी पंढरपूर येथे होणाऱ्या आषाढी कार्तिकी वारीचे सुंदर असे वर्णन केलेले दिसून येते. हा अभंग समजायला फार अवघड नाही. पण तो एका शिवभक्ताने स्वतःचे मनपरिवर्तन झाल्यावर लिहिला आहे हे त्याचे महत्व. पंढरी नगरी दैवत श्रीहरी । जाती वारकरी व्रतनेमें ।।१।।पंढरी नगरी मध्ये सर्वांचे आराध्य असणारा श्रीहरी निवास करतो. त्याला भेटण्यासाठी वारकरी येत असतात. वारकरी याचा अर्थच जे नियमित वारी करतात ते असा आहे. त्यांनी स्वतःला एक नियमात बांधून घेतले आहे. ते त्यांचे व्रत आहे, नियम आहे. शक्यतो ते हा नियम मोडत नाहीत. आजही अनेक वारकरी नियमितपणे पंढरपूरला जातात. पण या काळात तेथे जाणे हे फारसे नवल नाही. सातशे वर्षांपूर्वी पायी वारीला जाणे ही खरी कसोटी होती.आषाढी कार्तिकी महापर्वे थोर । भजनाचा गजर करिती तेथें ।।२।। वारकरी वर्षभर तेथे जातच असतात पण आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी ही दोन तर महापर्वे आहेत. अर्थात तेंव्हा येथे महाउत्सव असतो. वाळवंटी भक्तांची दाटी जमते.भजन कीर्तन यांचा गजर अखंड सुरू असतो. टाळ मृदंगाचे आवाज कानी पडत असतात. विठ्ठल नामाचा जयघोष होतो. साधुसंत थोर पताकांचा भार । मुखीं तो उच्चार नामामृत ।।३।। सर्व साधू संत, भक्त, वारकरी सर्वांच्या हाती, खांद्यावर विठ्ठलाची पताका फडकते. विठ्ठलाचे नामरुपी अमृत सगळेजण प्राशन करत असतात. त्यांच्या मुखी अन्य काही नाव नसते. विठ्ठल नावाचाच उच्चार ते सतत करतात. मनापासून, चित्त हरपून ते विठ्ठलाची आराधना करतात.आनंदाचा काला गोपाळकाला केला । हृदयीं बिंबला नरहरी ।।४।। वारकरी संप्रदायात जे अखंड हरिनाम सप्ताह साजरे केले जातात त्यात गोपाळकाला हा अतिशय महत्वाचा भाग आहे. सर्वांनी मिळून एकत्रित येऊन विठ्ठलाच्या नावाचा जयघोष करत प्रसादाचा काला सेवन केला जातो. यात विठ्ठलाच्या पायी सर्वजण एकरूप झाल्याची भावना असते. भेदभाव विसरून , अमंगळ ते सर्व नष्ट करून प्रसन्न, मंगलमय वातावरणात हे सगळं घडतं. संत नरहरी सोनार म्हणतात माझ्या हृदयात विठ्ठल बिंबला गेला आहे. असे म्हटले जाते की सर्व संतांनी विठ्ठलाच्या देहात आपापली जागा निश्चित केली आहे. संत नरहरी सोनार यांना देवाच्या कटीवर म्हणजे कंबरेवर जागा मिळाली . म्हणून वारकरी विठ्ठलाला भेटताना त्याच्या कटीला हात लावतात तेंव्हा ते संत नरहरींना भेटत असतात. यातून लक्षात घेण्याची, शिकण्याची गोष्ट अशी की जिथे विठ्ठलाने कधीही आपल्या भक्तांमध्ये भेदभाव केला नाही तिथे आपण कोण आहोत हे भेद करणारे? ईश्वर एकच आहे तो वेगवेगळ्या रुपात भक्तांना भेटत असतो. कोणी कमी महत्वाचा , कोणी अधिक असा आपल्या मनाचा भ्रम आहे. व्यापक दृष्टिकोन बाळगल्यास हे सर्व भेदभाव नष्ट होतील. ती दृष्टी सर्वांनी प्राप्त व्हावी हेच त्या पांडुरंगाच्या चरणी मागणे थांबुया.सजग रहा, सहज रहा..

# 'अविश्वासार्ह' वृत्तवाहिन्या!

**'सर्वात** बलशाली लोकशाही असलेला देश' अशी आपल्या भारताची संपूर्ण जगात ओळख आहे. 'पत्रकारिता' किंवा 'प्रसारमाध्यम' हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, असे म्हणतात. परंतु, आजचे 'गलिच्छ' राजकारण, स्वार्थी, मतलबी, ढोंगी 'कारभारी'; आणि त्यांच्या हातातले 'बाहुले' बनलेल्या 'उथळ' वृत्तवाहिन्यांचा 'तमाशा' बघून 'लोकशाही' खरेच अस्तित्वात आहे का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. तसेच चौथा स्तंभ हा केव्हाच उन्मळून पडला की काय? असाही प्रश्न उपस्थित होतो.वृत्तपत्र किंवा वृत्तवाहिन्या या समाजात रोज काय घडामोडी घडतात? हे दाखविणारा आरसा असतो. म्हणूनच प्रत्येक नागरिक त्यावर विश्वास ठेवून घडामोडी वाचतो किंवा बघतो. पण, आता हाताच्या बोटावर मोजण्याइतके वृत्तपत्र वगळता इतरांनी या आरशाला तडा दिला आहे. वृत्तवाहिन्यांबद्दल तर न बोललेलेच बरे. कोणतीही फालतू बातमी सखोल चौकशी न करता, आमच्या 'सुत्रांच्या' मिळालेल्या माहितीनुसार असे सांगत, 'ब्रेकिंग न्यूज' या गोंडस नावाखाली अक्षरशः प्रेक्षकांच्या माथी मारली जाते. यांना आतील माहिती देणारे यांचे 'सुत्रधार' नक्की कोण असतात? हा मोठा संशोधनाचा विषय तर आहेच. पण, ते कधीही न सुटणारे कोडेही आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये, असो.हे सर्व नमूद करण्याचे कारण म्हणजे, गुरुपौर्णिमेच्या दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिल्लीला गेले होते. त्यावरून त्यांच्यावर टीका–टिप्पणीला सुरुवात झाली. शिवसेनेचे आमदार नरेंद्र म्हस्के यांनी, शिंदे दिल्लीला गेले होते. परंतु, अमित शहा आणि शिंदेंची भेट झाली नसल्याचे माध्यमांना सांगितले. अर्थात, हे खरे की खोटे हे शिंदे आणि शहा हे दोघेच जाणो. क्षणभर, आपण समजूया की, या दोघांची भेट झाली असेल. ही भेट नक्कीच बंद दाराआड झाली असेल. भेट झाली म्हणजे, दोघांत चर्चाही झाली असेल. अर्थातच, ती 'हवा–पाण्या'वर गप्पा मारण्याची नक्कीच नसेल. मोदी, शहा, फडणवीस आणि शिंदेंच्या द्वेषाची काविळ झालेल्या विश्वप्रवक्त्याच्या हातात हे आयते



कोलीतच मिळाले. रोज सकाळी उठून भंपक, खोटे, निरर्थक आणि बेताल विधाने करण्याचा 'मानसिक' आजार जडलेल्या या महाशयांनी लगेच, ही भेट नक्की झाल्याचा दावा करत, शिंदेद्वेषाची 'मळमळ' ओकायला सुरुवात केली. ते म्हणाले की, माझ्याकडे पक्की माहिती आहे की, ( हे रोजचं ठरलेलं पालूपद) शिंदे हे फडणविसांची तक्रार करण्यासाठी गेले होते. आमच्या माणसांना प्राप्तीकर विभागाच्या नोटिसा येत आहेत. 'उध्दव आणि राज' एकत्र आले आहेत. मी माझा पक्ष भाजपमध्ये विलीन करतो, पण मला मुख्यमंत्री करा, अशी मागणी शिंदेंनी अमित शहांकडे केली, असे विश्वप्रवक्ते म्हणाले. वरतून शिंदे हे शहांचे बुट चाटायला गेले होते, असा घाणेरडा आरोपही त्यांनी केला. हे सांगताना, जसे काही तेही या दोघांच्या बैठकीला हजर होते, या अविर्भावात आणि खात्रीने ते बोलत होते.शिंदे हे उपमुख्यमंत्री आहेत. कोणत्याही प्रशासकीय कामासाठी ते केव्हाही आणि कितीही वेळा दिल्लीला जाऊ शकतात. या गोष्टीत गैर असे काहीच नाही; आणि कोणी हरकत घेण्याइतकी ही गंभीर बाबही नाही. परंतु, आमचे सरकार पाडले (खरे म्हणजे स्वतःच्याच अहंकार आणि कर्माने ते पडले आहे) या रागातून 'साप साप म्हणून भुई थोपटण्याची' सवय जडलेल्या; आणि सुडाचे राजकारण करणाऱ्या कारभाऱ्यांकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा ठेवणे म्हणजे, कपाळमोक्ष करून घेण्यासारखेच आहे.कोणत्याही दोन मोठ्या नेत्यांमध्ये 'बंद दाराआड' होणारी चर्चा म्हणजे, त्यांनी आखलेले राजकीय 'डावपेच' असतात. ते कधीही कोणाला समजणार नाहीत, याची ते पुरेपूर काळजी घेतात. याच धुर्तपणाला राजकारण असे म्हणतात.

एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री आहेत. ते सत्तेत आहेत. पण, सत्तेत नसतांना उध्दव ठाकरे, त्यांचे राजपूत्र दिल्लीला आणि स्वतः विश्वप्रवक्ते गोविंद बागेत कशासाठी जातात? याचाही खुलासा एकदा 'भांडूपच्या देवानंदने' करावा. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे, हाच स्वतःला अतिविद्वान समजणारा माणूस (?) अक्षरशः संपादक (?) असून पत्रकारांच्या बुमवर एकदा नव्हे तर, दोनदा थुकला होता. बुमवर थुकणे म्हणजे, समोरच्या पत्रकाराच्या तोंडावर थुंकण्यासारखे आहे. खरे जातिवंत, स्वाभिमानी आणि निर्भिड पत्रकार असते तर, निषेध करून त्याच्यावर बहिष्कार टाकला असता. पण, लाळघोट्या वृत्तवाहिन्यांच्या या एचएमव्ही दांडकेधा–यांना काहीच फरक पडला नाही. दुस–या दिवशी या महाशयांनी उत्तर देतांना सांगितले की, मी कोणालाही बोलवत नाही. हेच सकाळी सकाळी माझ्या कार्यालय किंवा घरासमोर रांगा लावतात.आश्चर्य म्हणजे, इतका अपमान होऊनही दुस–या दिवशी हे विकत घेतलेले 'निर्लज्ज सदासुखी' दांडकेधारी पुन्हा सकाळी सकाळी या महाशयांच्या दारात दाखल झाले. सांगायचा मुद्दा एवढाच की, वृत्तवाहिन्यांनी प्रत्येक बातमीची सखोल चौकशी करावी, मग ती प्रसारित करावी. अन्यथा केवळ टीआरपी वाढवण्यासाठी अशा भंपक आणि खोट्या बातम्या देऊ नये. उद्या प्रेक्षकांनी वृत्तवाहिन्या बघण्याचे बंद केले तर, आश्चर्य वाटायला नको. कारण, अशा निरर्थक आणि भंपक बातम्या प्रसारित करुन, तुम्ही तुमची विश्वासार्हता कमी करत आहात, याचे भान ठेवावे, हीच अपेक्षा.

प्रदीप व्ही. खोलमकर
नाशिक.
मो. ८७६७५९२९८०

## शून्यातून विश्व निर्माण करणारे यशस्वी उद्योजक तानाजी जाधव यांचा सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत उद्योगाच्या माध्यमातून विश्व निर्माण करणारे तालुक्यातील येडशी येथील युवा उद्योजक व धाराशिव सकल मराठा वधु–वर सूचक समितीचे मार्गदर्शक तानाजी जाधव यांचा मराठा वधू–वर सूचक समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. जाधव यांच्या येडशी येथील साईराज फर्नीचर इलेक्ट्रॉनिक शो रूम ला भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. तानाजी जाधव यांनी आपल्या व्यवसाय व उद्योगात भरारी घेतली आहे. त्याबद्दल



सकल मराठा वधूवरसूचक समितीकडून त्यांचे अभिनंदन केले.याप्रसंगी समितीचे संयोजक अशोकराव गायकवाड,प्रा अभिमान हंगरगेकर,माजी गटशिक्षणाधिकारी राजू तांबे,आरंभ मराठीचे संपादक चंद्रसेन देशमुख, गोरोबा लोंढे,ॲड रमेश भोसले,कमलाकर मुंडे,अर्जुन जाधव,अण्णासाहेब कदम,राजाभाऊ जगताप,माजी मुख्याध्यापक अशोक ठोंबळ,विजय पवार,अमोल निंबाळकर,बी.बी.मोरे,महादेव तांबे आदी मान्यवर उपस्थित होते.

## भाजपाच्या धाराशिव तालुका उपाध्यक्षपदी बालाजी पांढरे तर चिटणीस पदावर प्रवीण साळुंखे यांची नियुक्ती

आरंभ मराठी | तेर

भारतीय जनता पक्षाच्या धाराशिव तालुका (ग्रामीण) च्या उपाध्यक्षपदी तेर येथील बालाजी पांढरे यांच्या सह सहा जणांची नियुक्ती करण्यात आली असून चिटणीस पदावर प्रवीण साळुंखे यांची नियुक्ती करून ७९ जणांची नवीन तालुका कार्यकारिणी गठित करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली व धाराशिव जिल्हा भाजपाचे अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका ग्रामीणची कार्यकारिणी तालुकाध्यक्ष निळकंठ पाटील यांनी जाहीर केली. धाराशिव तालुका चिटणीस पदावर प्रवीण साळुंखे यांच्या सह सहा जणांची वर्णी लावण्यात आली आहे. तर ४३ जणांच्या तालुका कार्यकारिणीमध्ये



सदस्य म्हणून नवनाथ पसारे व जयदेवी शिराळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुका कार्यकारिणीत ४ सरचिटणीस, ६ चिटणीस, १ कोषाध्यक्ष, ५ तालुका पदाधिकारी, ४३ कार्यकारणी सदस्य, विविध सेल, आघाडी व मोर्चा आदी १४ विभागाच्या संयोजकपदी नियुक्ती करण्यात आल्या आहेत. नियुक्तीचा आदेश तालुका अध्यक्ष निळकंठ पाटील यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

CMYK

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संमिश्र

शुक्रवार ,दि. 18 जुलै 2025



# तुरीवरील किडींमुळे नुकसानीचे सावट; नियंत्रणासाठी जैविक व रासायनिक उपायांची गरज

## पानांवर किडींचे थैमान; फवारणीसह जैविक नियंत्रणाचे तज्ज्ञांचे मार्गदर्शन

हर्षवर्धन मडके | आरंभ मराठी

**मोहा:** जिल्ह्यातील शेतकरी तुरीच्या मुख्य हंगामात मेहनतीने पीक फुलवून उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र तुरीवरील किडींचा वाढता प्रादुर्भाव चिंतेचा विषय ठरत आहे. विशेषतः पानाफुलांची जाळी करणारी अळी, शेंगमाशी, फुलकिडे, मावा आणि पिठबा ढेकूण या किडीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. पानाफुलांची जाळी करणारी अळी आणि पिसारी पतंगही तुरीवर हल्ला करत आहेत. हे कीटक पाने, फुले आणि शेंगा एकत्र करून त्यात लपून नुकसान करतात. अशा कीटकांवर निंबोळी अर्क व जैविक कीटकनाशकांची फवारणी करणे प्रभावी ठरते. तसेच फुलकिडे व मावा हे रसशोषक कीटक असून ते पानांवरील पेशींमध्ये अंडी घालून झपाट्याने वाढतात. यांच्यावर डायमिथोएट, मिथिल डिमेटॉन यासारख्या कीटकनाशकांची फवारणी केली जाते. विशेषतः उशिरा परिपक्व होणाऱ्या तूर वाणांवर शेंगमाशीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येतो. ही किड शेंगांवर पारदर्शक छिद्रे पाडून आत कोषावस्थेत जाते. यामुळे उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. यावर लॅम्बडा सायहॅलोथ्रीन, क्विनालफॉस, मोनोक्रोटोफॉस यासारखी किडनाशके प्रभावी मानली जातात. दरम्यान, पिठबा ढेकूण या किडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जैविक किडनाशकांचा वापर करण्यात यश येत आहे. कृषी विभागाने व्हर्टीसिलियम लेकॅनी व मेटारायझियम ॲनिसोप्ली यांची फवारणी आर्द्र वातावरणात करण्याची शिफारस केली आहे. रासायनिक नियंत्रणाची आवश्यकता भासल्यासच डायक्लोव्हॉस, ट्रायझोफॉस यासारखे किडनाशक वापरण्याचा सल्ला दिला जात आहे. शेतकऱ्यांनी प्रादुर्भाव लक्षात घेऊन वेळेवर उपाययोजना केल्यास उत्पादनाचे मोठ्या प्रमाणावर संरक्षण करता येईल. एकूणच, जैविक व रासायनिक उपायांचा संतुलित वापर आणि वेळोवेळी निरीक्षण केल्यास तुरीवरील किडींचा प्रभावी बंदोबस्त शक्य आहे.



### कृषी जैविक उपाययोजना

५% निंबोळी अर्क / ॲझाडिरेक्टीन (३०० ) वापरणे बॅसीलस थ्युरीनजेन्सीस व एच.ए.एन.पी.व्ही.यांसारख्या विषाणूजन्य जैविक किटकनाशकांची फवारणी

### मित्र किडींचे संवर्धन


निळे चिकट सापळे (५०-६० प्रति हेक्टर) लावणेपक्षी थांबे उभारणे (टी-आकाराचे ५०-६० प्रति हेक्टर)



### रासायनिक उपाययोजना

इंडोक्झाकार्ब १४.५%, इमामेक्टीन बेंझोएट ५%, क्लोरान्ट्रानिलीप्रोल १८.५%डायमिथोएट, मिथिल डिमेटॉन, इमिडाक्लोप्रिड रसशोषक किडीसाठीलॅम्बडा सायहॅलोथ्रीन, क्विनॉलफॉस, मोनोक्रोटोफॉस शेंगमाशी नियंत्रणासाठीफवारणीचे वेळापत्रक काटेकोर पाळावे पहिली फुलकळी अवस्थेत, दुसरी ५०% फुलोऱ्यावर, तिसरी १५ दिवसांनी

# खरीप हंगामाच्या लागवडीसाठी कांदा रोपाला मागणी वाढली



आरंभ मराठी | पळसप

मे महिन्यात झालेला अवकाळी पाऊस आणि त्यानंतर आजपर्यंत पावसाने दिलेली उघडीप या कारणामुळे आजही बऱ्याच भागात वीस ते तीस टक्के शेतकऱ्यांनी आणखी सोयाबीन किंवा इतर खरिपाची पेरणी केलेली नाही. आणि वेळेत पाऊस झाला नाही तर उशीर होऊन त्याचा उत्पन्नावर परिणाम होईल आणि रब्बीचीही पेरणीला उशीर होईल. या कारणाने सद्या खरिपाची पेरणी न झालेले शेतकरी आणि ज्यांच्याकडे काहीशी सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता आहे असे शेतकरी सद्या कांदा लागवडीला प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. तर धाराशिव , लातूर , बीड सोलापूर जिल्ह्यासह कर्नाटकच्या काही भागातील शेतकरी कांदा रोपाची मागणी करत असल्याचे नर्सरी चालकाकडून सांगण्यात आले. पावसाळा सुरू होऊन दोन महिने होत आले तरी पाऊस नसल्याने दर वर्षीच्या तुलनेत यंदा पाण्याअभावी आणि मागील वर्षीच्या रब्बी कांद्याला भाव कमी मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांनी कांदा लागवड केलेली नाही. लागवड कमी झाल्याने खरिपाच्या उत्पन्नात घट होण्याची चिन्हे नाकारता येत नाहीत. त्यामुळे यंदा खरिपाच्या कांद्याला चांगले दर मिळतील या अपेक्षेने बऱ्याच भागातून रोपांसाठी शेतकरी मागणी करत आहेत. तर बऱ्याच शेतकऱ्यांनी लागवडीसाठी रोपे घेऊन गेले असल्याचेही पळसप येथील कांदा रोपवाटिका चालक महादेव नरवडे यांच्याकडून सांगण्यात आले.

# हरित धाराशिव अभियानात शिक्षक परिषद देणार योगदान

आरंभ मराठी | धाराशिव

केंद्र शासनाच्या '' एक पेड माँ के नाम '' या योजनेअंतर्गत व राज्य शासनाच्या '' माझी वसुंधरा अभियान '' उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन आयोजित '' हरित धाराशिव - २०२५ '' या अभियानात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद संघटनेचे जिल्ह्यातील सर्व शिक्षक-शिक्षिका पदाधिकारी कृतीयुक्त सहभाग देणार असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली. यावर्षी धाराशिव जिल्ह्यात ४० लक्ष वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून शनिवारी (दि.१९) एकाच दिवसात पंधरा लक्ष वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यावेळी शिक्षक परिषदेचे जिल्ह्यातील सर्व शिक्षक-शिक्षिका पदाधिकारी '' हरित धाराशिव- २०२५ '' अभियानात प्रत्यक्ष वृक्ष लागवड करून कृतीयुक्त सहभाग देण्याचे आवाहन परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

# शेतरस्त्याचा प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढल्याबद्दल शेतकऱ्यांनी मानले प्रशासनाचे आभार

आरंभ मराठी | नारंगवाडी

शेतरस्त्याचा प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढल्याबद्दल नारंगवाडी येथील शेतकऱ्यांनी नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे यांचे आभार मानले. उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील शेतकरी यांनी शेत रस्त्याचे प्रकरण दाखल केले होते. नवीन शासन निर्णयानुसार ९० दिवसाच्या आत निकाल देण्याचे शासनाने आदेश जारी केला आहे. उमरगा तहसील कार्यालयात दिनांक १६ जून रोजी हे प्रकरण दाखल केले होते नवीन आदेशाची दखल घेत तहसील कार्यालय उमरगा येथील नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे यांनी अवघ्या २८ दिवसात निकाल दिल्यामुळे शेतकऱ्याकडून आनंद व्यक्त केला जात आहे. शेतरस्त्याची जी प्रकरणे जे वर्षानुवर्ष प्रलंबित राहत आहेत ती प्रकरणे २८ दिवसात निकाली काढण्याच्या शासनाच्या आदेशाचे पालन उमरगा येथील नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे यांनी केले आहे. लवकर निकाल देण्याच्या आदेशामुळे शेतकऱ्याकडून शासनाचे आभार व्यक्त करण्यात आले. भीमाशंकर बेरुळे यांनी शेतकऱ्याला चकरा मारायला लावल्या नाहीत. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना शेतरस्ता उपलब्ध झाल्यामुळे त्यांनी प्रशासनाचे आभार मानले.



# मुक्ताई बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बुधवारी (दि.१६) लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त व सामाजिक न्याय विभागाच्या वर्धापन दिनानिमित कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र, शाल व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन धाराशिव येथील सामाजिक न्याय विभागातील अधिकारी अतुल जगताप, कपिल थोरात, रमेश वाघमारे, रामभाऊ गुरव, संकेत जगताप, युवराज चव्हाण , संकेत भोसले यांना कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचारी म्हणून ''लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू पुरस्कार - २०२५ '' या पुरस्काराने सन्मानित करून सन्मानपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सहाय्यक आयुक्त सचिन कवले तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक अधीक्षक गवळी मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन मुक्ताई बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ गायकवाड, मारुती अंकुशराव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संदीप अंकुशराव यांनी केले.

# जनसुरक्षा कायद्याविरोधात काँग्रेस पक्षाचे आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्र शासनाने नुकताच जनसुरक्षा कायदा मंजूर केला आहे. या कायद्यामधील तरतुदी लोकशाही प्रणालीच्या विरोधात आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या स्वातंत्र्याची व नागरी हक्कांची पायमल्ली होणार असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने केला आहे. या जनविरोधी कायद्या विरोधात जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने विधेयकाची होळी आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच सदरील विधेयक तात्काळ रद्द करण्यात यावे अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांना निवेदन देऊन निषेध नोंदवण्यात येणार आहे. हे आंदोलन आज (दि.१८) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, स्थानिक स्वराज संस्थाचे माजी पदाधिकारी, शहराध्यक्ष, तालुकाध्यक्ष, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, विद्यार्थी काँग्रेस, सर्व फ्रंटल, सेलचे प्रमुख, काँग्रेसचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन काँग्रेस कमिटीचे धाराशिव जिल्हाध्यक्ष ॲड धिरज आप्पासाहेब पाटील यांनी केले आहे.

# जागतिक बुद्धिबळ दिनानिमित्त शहरात रविवारी भव्य बुद्धीमंथन स्पर्धा


## श्री सिद्धिविनायक सोशल फाउंडेशनचा बुद्धीमंथन सोहळा

### ३० हजारांची रोख पारितोषिके, ट्रॉफी व मेडल्स देणार:विविध वयोगटांसाठी स्पर्धा



आरंभ मराठी | धाराशिव

बुद्धिमत्तेचा, संयमाचा आणि दूरदृष्टीचा जागतिक स्तरावर सन्मान मिळवलेल्या बुद्धिबळ खेळाच्या जागतिक बुद्धिबळ दिनानिमित्त जिल्ह्यात बुद्धीमंथन या भव्य रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवार, २० जुलै रोजी डीआयसी रोड छत्रपती संभाजी महाजारनगर येथील श्री सिद्धिविनायक परिवार हॉल येथे ही स्पर्धा पार पडणार असून, सकाळी ९ वाजता स्पर्धेला सुरुवात होणार आहे तर सायंकाळी ७ वाजता बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. एकदिवसीय स्पर्धेचे आयोजन श्री सिद्धिविनायक परिवार, धाराशिव जिल्हा बुद्धिबळ संघटना, जी.एच. रायसोनी स्पोर्ट्स ॲण्ड कल्चर फाउंडेशन, कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे. बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विद्यार्थ्यांच्या विवेक, संयम व निर्णयक्षमता वृद्धिंगत करणारे प्रभावी माध्यम आहे. बुद्धीमंथन उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासाला चालना मिळेल. त्यामुळे अधिकाधिक स्पर्धकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री सिद्धिविनायक सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी आणि असोसिएशनचे जावेद शेख यांनी केले आहे.खुला गट अंडर-१९ अंडर-१५ अंडर-११ या गटांमध्ये होणार स्पर्धा पार पडणार आहेत. स्पर्धे साठी एकूण ३० हजार रुपयांची रोख पारितोषिके, आकर्षक ट्रॉफी, मेडल्स व स्मृतिचिन्हे ठेवण्यात आली आहेत.



# साहित्य संमेलन हे समाज व साहित्यिकांसाठी टॉनिकच

## साहित्यिक सुभाष चव्हाण यांचे मत

आरंभ मराठी | धाराशिव

साहित्यसंमेलनम्हणजेसाहित्यिकांच्या लेखणीसाठी मिळालेली एक ऊर्जा असते, तसेच ते समाजासाठी सुद्धा टॉनिकचे काम करत असते, असे मत सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा साहित्यिक सुभाष चव्हाण यांनी व्यक्त केले.अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीतर्फे कवी कालिदास दिनानिमित्त आयोजित 'मेघदूत कविसंमेलन' च्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. वडगाव येथील श्रीक्षेत्र सिद्धेश्वर मंदिराच्या परिसरातील निसर्गरम्य वातावरणात हे कवी संमेलन पार पडले.प्रमुख अतिथी म्हणून देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे, साहित्य भारतीचे जिल्हाध्यक्ष भागवत घेवारे, ज्येष्ठ कवी राजेंद्र अत्रे, कार्यवाह रवींद्र शिंदे उपाध्यक्ष कविता पुदाले, डॉ संजय सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती होती. कवी संमेलनात वेगवेगळ्या विषयांवर केलेल्या काव्याचे बहारदारपणे सादरीकरण झाले. साहित्य भारतीचे प्रचारप्रमुख शंकर खामकर यांनी नुकत्याच झालेल्या पहलगाम हल्ला प्रकरणावर अतिरेक्यांच्या गोळीबाराने आयुष्य उद्ध्वस्त झाले, हे शीर्षक असलेली कविता सादर केली आणि भावनिक वातावरण निर्माण झाले. केशेगाव येथील बाळासाहेब मगर यांनी 'अजून बाप शेताच्या बांधावर, का पुरा काळजात उतरला नाही, मी आई सांगत राहिलो, जगाने माझ्यातला बाप पाहिला नाही' या तालासुरातील सादर केलेल्या कवितेबरोबरच नुकत्याच देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या कार्यासंदर्भात निर्मित झालेल्या चित्रपटासाठी एकमेव गीत लिहिलेल्या गीतकार सौ. सुरभी भोजने यांनी कवितेचे सुंदर रसबहार सादरीकरण केले. तर खानापूर येथील अरुण कांबळे यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या संदर्भात 'चला रे मुलांनो शाळेला' ही विद्यार्थ्यांसाठी कविता सादर केली. तर ॲड. जयश्री तेरकर यांनी केलेल्या भावपूर्ण सादरीकरणाला टाळ्यांचा कडकडाट मिळाला.मनिषा पोतदार, अविनाश मुंडे, अश्रुबा कोठावळे, कृष्णा साळूंके, चंदन सुर्यवशी, बालकवी सत्येंद्र चक्के यांनी आपल्या पसंतीचे काव्य सादर करून टाळ्यांची दाद मिळवली. ज्येष्ठ कवी भागवत घेवारे यांनी 'नकोस मानू राग पावसा, फुलव साऱ्यांची बाग पावसा, कसेल त्याची पिकेल शेती, तुझा हवा सहभाग पावसा..' ही शेतकऱ्यांची अवस्था सांगणारी रचना सादर केली. इतिहास संशोधक तथा साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे यांनी 'हुंदक्यांनी ज्या घराचा कोपरा रडतो, वैभवाचा त्या ठिकाणी वारसा रडतो' ह्या गझल सादरीकरणाने सर्वांना अंतर्मुख केले. ज्येष्ठ कवी राजेंद्र अत्रे यांनी देखील त्यांच्या खजिन्यातील काव्य सादर करून सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.मेघदूत कवी संमेलनाचा समारोप करताना संमेलनाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण यांनी आपल्या रसभरीत काव्य सादरीकरणाने सगळ्यांना दिलखुलासपणे प्रफुल्लित केले. त्यांनी आपल्या सादरीकरणातून म्हटलं की, रत्नपारख्यांनी रत्नं पारखावी, त्याची माळ गुंफावी तशा दर्जेदार रचना सर्व कवींनी केल्याबद्दल कौतुक करत स्वत:ची निसर्गावरील 'झुळझुळ पाणी हिरवी वाट, पाचुवाणी झाडी दाट, गर्भ रेशमी धार, पाणीच पाणी दारोदार' या ओघवत्या कवितेची रचना सादर केली. बहारदार सूत्रसंचालन माधुरी घोडके (नळदुर्ग) यांनी केले. आभार सुरभी भोजने यांनी मानले.



# कुलदीप सावंत यांना राज्यस्तरीय विश्वकर्मा कामगार भूषण पुरस्कार

आरंभ मराठी | धाराशिव

येथील क्रीडा शैक्षणिक व सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले क्रांतिसूर्य अण्णासाहेब पाटील सोशलवर्क कॉलेज तसेच विविध असोसिएशनचे सचिव कुलदीप सावंत यांना राज्यस्तरीय विश्वकर्मा कामगार भूषण पुरस्कार सन २०२५ जाहीर करण्यात आला आहे. कोल्हापूर येथील राज्य गुणवंत कामगार व जागृत नागरिक सेवा संस्था महाराष्ट्र सेवाभावी संस्थेच्या वतीने कुलदीप सावंत यांना क्रीडा व शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, कुलदीप सावंत हे महाराष्ट्र हँडबॉल व डॉजबॉल असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य म्हणून काम पाहतात. धाराशिव जिल्हा हँडबॉलचे सचिव तसेच डॉजबॉल, स्क्वॅश रेकेट, व श्री तुळजाभवानी क्रीडा प्रबोधनी असे विविध असोसिएशनचे ते सदस्य म्हणून काम पाहतात. हा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे क्रीडा क्षेत्रामध्ये धाराशिव विभागांमध्ये सर्वत्र अभिनंदन होत आहे. तसेच हा पुरस्कार लोकप्रतिनिधी व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सावंत यांना सन्मानित करण्यात येणार आहे. स्मृतीचिन्ह,मानपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप आहे,अशी माहिती समितीचे अध्यक्ष सुरेश केसरकर व सचिव अच्युत माने यांनी दिली आहे.



# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत ११ महिन्यांसाठीच कार्यप्रशिक्षणाची संधी

## समाज माध्यमावर फिरत असलेला शासन निर्णय खोटा

आरंभ मराठी | धाराशिव

कौशल्य विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'चा कालावधी ५ वर्ष करण्यात आल्याबाबतचा शासन निर्णय व्हाट्स ॲपवर फिरत आहे. हा शासन निर्णय हा खोटा असून, जनतेच्या फसवणुकीचा प्रकार आहे. असा कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना फक्त ११ महिन्यांसाठीच कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध आहे,अशी माहिती कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून देण्यात आली आहे.राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरिता मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेत पूर्वी सहा महिने तर सध्या हा कालावधी वाढवून ११ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षण संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.या योजनेत इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रतिमाह ६०००,आयटीआय अथवा पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ८०००, पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह १०,००० इतके विद्यावेतन देण्यात येते हे विद्यावेतन प्रशिक्षणार्थींच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होत असते,अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून देण्यात आली आहे.

CMYK

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
आपलं धाराशिव
शुक्रवार ,दि. 17 जुलै 2025

# पीएम धनधान्य योजनेचा पाच लाख शेतकऱ्यांना होणार फायदा

## शेतीचे आधुनिकीकरण होऊन शेतकऱ्यांना मिळणार आर्थिक सुरक्षा

आरंभ मराठी | धाराशिव

केंद्र सरकारने बुधवारी (दि.१६) कॅबिनेट बैठकीत पीएम धनधान्य कृषी योजनेला मंजुरी दिली. केंद्र सरकारची ही अतिशय महत्त्वाकांक्षी योजना असून, आकांक्षीत जिल्हा म्हणून या योजनेचा धाराशिव जिल्ह्याला देखील फायदा होणार आहे. देशातील १०० आकांक्षीत जिल्ह्यांचा या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील पाच लाख शेतकऱ्यांना या योजनेचा थेट फायदा होणार आहे. शेतीची नवनवीन अवजारे, सिंचन सुविधा आणि साठवण क्षमता वाढवत शेतकऱ्यांना थेट लाभ देण्याचा प्रयत्न या योजनेतून केला जाणार आहे. शेतीविषयक विविध ३६ योजना एकत्रित करुन ही योजना अमलात आणली जात आहे. या योजनेमुळे शेतीचे आधुनिकीकरण होऊन शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा मिळणार आहे.




शेती पद्धतींचे आधुनिकीकरण करणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा प्रदान करणे हे पीएम धनधान्य योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना ग्रामीण उपजीविकेला आधार देण्यासाठी तंत्रज्ञान-चलित उपायांचा समावेश करून शाश्वत आणि हवामान-लवचिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मदत करेल. विशेषतः कमी उत्पादकता, मध्यम पीक तीव्रता आणि सरासरीपेक्षा कमी कर्ज उपलब्धता असलेल्या १०० जिल्ह्यांना लक्ष्य ठेऊन ही योजना सुरू करण्यात आली आहे. प्रधानमंत्री धनधान कृषी योजनेचा देशभरातील अंदाजे १.७ कोटी शेतकऱ्यांना याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. तर धाराशिव जिल्ह्यातील ५ लाख शेतकऱ्यांना याचा फायदा होईल. पीक विविधीकरण आणि शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देऊन कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळवून देण्यासाठी आणि अपव्यय खर्च कमी करण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत आणि ग्राम पंचायत पातळीवर कापणीनंतर साठवणूक पायाभूत सुविधा विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेत जमिनीचा वापर आणि पीक उत्पादन वाढवण्यासाठी सिंचन सुविधांचा विस्तार करण्याचेही उद्दिष्ट्य आहे. शेतकऱ्यांना दीर्घकालीन कृषी शाश्वततेसाठी आधुनिक उपकरणे, दर्जेदार बियाणे आणि प्रगत शेती तंत्रांमध्ये गुंतवणूक करण्यास मदत करण्यासाठी ते अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही प्रकारचे कर्ज प्रदान करण्याचा प्रयत्न या योजनेतून होणार आहे.

### योजनेचा नेमका फायदा काय होणार

या योजनेत जे अल्प भूधारक आणि सीमांत शेतकरी आहेत, त्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी आर्थिक मदत आणि आधुनिक तंत्रांची अपेक्षा करत आहेत, अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होईल. कृषी सहकारी संस्था आणि एफपीओ यांचा उद्देश बाजारपेठेतील पोहोच वाढवणे आणि चांगल्या किंमत संरचनांचा लाभ घेणे आहे. कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढवण्यासाठी नाविन्यपूर्ण शेती उपाय विकसित करण्यात गुंतलेले कृषी-तंत्रज्ञान स्टार्टअप्स या योजनेचा लाभ घेतील. तसेच तंत्रज्ञानावर आधारित शेतीद्वारे कृषी क्षेत्रात आर्थिक स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील महिला शेतकरी आणि स्वयंसहायता गटांनाही लाभ होणार आहे. सुधारित पायाभूत सुविधा, वाढलेली कर्ज उपलब्धता आणि रोजगाराच्या संधींचा फायदा ग्रामीण समुदायांना होण्यास मदत होणार आहे.

### सिंचनासह शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य

ही योजना शेतकऱ्यांना अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्ज सहाय्य प्रदान करेल. ज्यामुळे आधुनिक उपकरणे, दर्जेदार बियाणे आणि प्रगत शेती तंत्रे अधिक सुलभ होतील. ही योजना सिंचन व्याप्ती वाढवेल आणि पीक तीव्रता आणि उत्पन्न स्थिरता वाढविण्यासाठी कार्यक्षम पाणी वापर तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देईल. नाविन्यपूर्ण शेती साधनांना प्रोत्साहन देण्यासाठी योजनेची मदत होणार आहे.

## अमृताला वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत

### जिजाऊ, सावित्री, रमाई महिला बळ विकास समितीचा पुढाकार



आरंभ मराठी | वाशी

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेच्या जिजाऊ, साविज्ञी, रमाई महिला बळ विकास समितीच्या पुढाकारातून केएमजेएम महाविद्यालयातील विद्यार्थिनी अमृता रामगुडे हिला वैद्यकिय उपचारासाठी ८६ हजार रुपयांची आर्थिक मदत पालकांकडे बुधवारी (दि.१६) महाविद्यालयात देण्यात आली. कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या अमृता रमगुडे या विद्यार्थिनीला गंभीर आजार झाला असून, तिच्या घरची परिस्थिती बेताचीच आहे. अमृता हिच्या आजाराची माहिती मिळाल्यावर संस्थेच्या जिजाऊ,सावित्री,रमाई महिला बळ विकास समितीने पुढाकार घेत महाविद्यालयातील प्राध्यापकांना अमृता हिच्या उपचारासाठी आर्थीक साह्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यानुसार समितीने समाजातून ५१ हजार रुपयांची आर्थीक मदत मिळवत येथील जगदाळे महाविद्यालयाच्या प्राध्यापाकडुण ३५ हजार रुपयाची अशी एकुण ८६ हजार रुपयांची आर्थीक मदत अमृता हिच्या उपचारासाठी बुधवारी तिच्या पालकांकडे सुपूर्द केली. यावेळी प्राचार्य डॉ.अशोक कदम, महिला बळ विकास समितीच्या अध्यक्ष डॉ.स्मिता सुरवसे, उपाध्यक्ष जयश्री गवळी, सचिव मंजुषा श्रीमंगल, सहसचिव प्रा.डॉ दैवशाला रसाळ, कार्यध्यक्ष प्रा.डॉ. लाजवंती राठोड, प्रा.ज्योती यादव यांच्यासह समितीचे पदाधिकारी, प्राध्यापक, प्राध्यापेकेतर कर्मचारी आदिंची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सुनिता डोके यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.प्राजक्ता मोरे यांनी तर आभार प्रा. लांडगे यांनी मानले.

## संवर्ग एकमधील शिक्षकांच्या समस्या तातडीने सोडवण्याचे आदेश

### धाराशिव जिल्ह्यातील शिक्षकांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी

आरंभ मराठी | धाराशिव

संवर्ग एक मधील समावेशनास पात्र असूनही केवळ सॉफ्टवेअरच्या तांत्रिक अडचणीमुळे बदली प्रक्रियेपासून वंचित राहिलेल्या धाराशिव जिल्हा परिषदेमधील दिव्यांग शिक्षकांच्या समस्या सॉफ्टवेअर कंपनीशी चर्चा करून तातडीने सोडवा असे आदेश औरंगाबाद उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. धाराशिव जिल्हा परिषदेच्या अन्यायग्रस्त शिक्षकांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे आदेश दिले. सध्या राज्यामध्ये जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्यांची ऑनलाइन प्रक्रिया सुरू आहे. त्यामध्ये चार संवर्ग करण्यात आलेले आहेत. त्यातील संवर्ग एक मध्ये दिव्यांग शिक्षकांचा समावेश आहे. या प्रवर्गात समावेश होण्यासाठी दिव्यांग शिक्षकांनी आपल्या वैद्यकीय प्रमाणपत्राची पुनर पडताळणी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेने संबंधित शिक्षकांना दिले होते. त्यानंतर तालुकास्तरीय समितीने पडताळणी प्रमाणपत्रा अभावी दिव्यांग असूनही काही शिक्षकांना संवर्ग एक मधून अपात्र ठरविण्यात आले होते. या शिक्षकांनी त्यावर केलेल्या अपीलामध्ये त्यांचे म्हणणे ग्राह्य मानून शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी त्यांचे अपील मंजूर केले होते मात्र बदली प्रक्रिया सुरू असताना ऑनलाइन सॉफ्टवेअर मध्ये बदल करता येत नसल्याचे कारण दाखवून त्यांचा संवर्ग एक मध्ये समावेश केला गेला नव्हता. त्यांनी त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडेही अपील केले होते. तरी देखील परिस्थितीमध्ये फरक पडला नाही. त्यामुळे अखेर या अन्यायग्रस्त शिक्षकांनी वैशाली पवार यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद उच्च न्यायालयात दाद मागितली. या याचिकेची व्दिसदस्यीय पीठासमोर तातडीने सुनावणी झाली. या सुनावणीत या शिक्षकांचे गाऱ्हाणे योग्य असूनही केवळ तांत्रिक अडचणीमुळे त्यांना न्याय दिला जात नाही हे लक्षात आल्यानंतर न्यायालयाने त्याची गंभीर दखल घेत अशाप्रकारे दरवर्षी अनेक शिक्षकांवर अन्याय होऊ शकतो, त्यामुळे राज्य सरकारने संबंधित सॉफ्टवेअर कंपनी बरोबर संपर्क साधून अन्यायग्रस्त शिक्षकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात आणि पुढील ४ ऑगस्ट या तारखेस त्याबाबतची माहिती द्यावी असे आदेश दिले. त्यामुळे या शिक्षकांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याचिकेमध्ये शिक्षकांच्या वतीने एडवोकेट ईस्टलिंग मुरगे यांनी काम पाहिले. याचिकाकर्त्यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य कार्यकारणी सदस्य कल्याण बेताळे व दिव्यांग कर्मचारी संघटनेचे महादेव शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

## हरित धाराशिव अभियानांतर्गत १२ हजार वृक्षांची होणार लागवड

### पर्यावरण संवर्धनाला मिळणार नवी दिशा

आरंभ मराठी | कळंब

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांच्या संकल्पनेतून साकारण्यात येत असलेल्या ''हरित धाराशिव'' अभियानांतर्गत कळंब येथे नगर परिषदेच्या वतीने उद्या शनिवारी (दि.१९) एकाच दिवसात १२००० वृक्षाची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कळंब शहरातील सर्वे नं ३ येथील सार्वजनिक स्मशानभूमी येथे सकाळी सहा वाजता हा वृक्षारोपण कार्यक्रम होणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या सर्व विभागांच्या पुढाकारातून धाराशिव जिल्ह्यात एका दिवसात १५ लक्षापेक्षा जास्त वृक्षारोपण करण्याचा महत्वकांक्षी संकल्प केला आहे. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा आणि सर्वांनी सहभाग द्यावा, किमान ४० गुंठे एवढ्या क्षेत्राची ''कळंब देवराई'' निर्माण होऊन, हा सृष्टीचा ठेवा पुढील पिढ्यांसाठी पर्यावरणीय वारसा ठरेल असे आवाहन कळंब नगर परिषदेच्या मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांच्यामार्फत करण्यात आले आहे. कळंब नगरपरिषद, वन विभाग व स्थानिक प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने लागवडीची सर्व पूर्वतयारी पूर्ण झाली असून, लागवडीसाठी आवश्यक रोपे, खते, पाणीपुरवठा व संरक्षक साधनांची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे परिसरात जैवविविधतेत वाढ होणार असून, नागरिकांना निसर्गाशी आपले नाते घट्ट करण्याची संधी मिळणार आहे. वृक्ष लागवड ही भविष्यासाठी दिलेली एक हरित भेट ठरणार आहे.

## महाजन महाविद्यालयात राष्ट्रीय कार्यशाळा

आरंभ मराठी | धाराशिव

भाषा हा व्यक्तिमत्व विकासातील महत्वाचा घटक असून, प्रभावी भाषेमुळे आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो तसेच भाषा ही राष्ट्राला जोडणारा महत्वाचा घटक आहे असे मत तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट चे सचिव ॲड. मिलिंद पाटील यांनी व्यक्त केले. येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात पाणिनीय वर्णोचार शिक्षा या विषयावर होणाऱ्या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रा.विद्यानंद आर्य, प्रा.डॉ. सुभाष राठोड,संस्था सदस्य कमलाकर पाटील, प्रा.वेदनीधी, प्रा.डॉ. मुकुंद गायकवाड, प्रा.डॉ.अरुण गंभिरे, प्रा.डॉ.अशोक मर्डे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रधानमंत्री उचत्तर शिक्षा अभियान प्रायोजित, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय हिंदी विभाग व हिंदी परिषद धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत हिंदी भाषेतील वर्णोचार पद्धती या विषयी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात प्रा.डॉ. विद्यानंद आर्य यांनी हिंदी भाषेतील वर्णोचार पद्धती या विषयी माहिती दिली. शब्दांचे उच्चार योग्य पद्धतीने उच्चारले पाहिजे तरच कोणतीही भाषा समृद्ध होते असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेत संस्था सदस्य कमलाकर पाटील यांनीही आपले मत यावेळी व्यक्त केले.

## राजकीय दृष्ट्या महत्वाच्या तेर ग्रामपंचायतीचे सरपंचपद पहिल्यांदाच ओबीसी सर्वसाधारण गटासाठी आरक्षित

आरंभ मराठी | तेर

राजकीय दृष्टीने महत्त्वाचे गाव असणाऱ्या धाराशिव तालुक्यातील तेर येथील सरपंचपद पहिल्यांदाच ओ.बी.सी.साठी आरक्षीत झाले आहे. तेर ग्रामपंचायतीच्या इतिहासात ओ.बी.सी.पुरूषासाठी पहिल्यांदाच आरक्षण निघाले आहे. महाराष्ट्र शासनाने १६ जून रोजी एक आदेश काढला असून त्यामध्ये १५ जुलै पर्यंत सरपंच पदासाठीचे आरक्षण सोडत काढण्याचे सुचीत केले होते. त्यानुसार धाराशिव जिल्ह्यातील तालुक्यातील ११० ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण १० जुलै रोजी निघाले आहे.त्यामध्ये तालुक्यातील मोठे गाव असणाऱ्या व १७ ग्रामपंचायत सदस्य असलेल्या तेर येथील सरपंच पद हे इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या प्रवर्गातील सर्वसाधारण




जागा आरक्षित होण्याची ही तेरच्या इतिहासातील पहिली वेळ आहे. यापुर्वी तेर ग्रामपंचायतचे सरपंच पद सर्वसाधारण महिला (१९९७-२००२), सर्वसाधारण पुरूष (२००२-२००७), अनुसूचित जाती पुरूष,(२००७-२०१२), ओ.बी.सी.महिला (२०१२-२०१७), सर्वसाधारण पुरूष (२०१७-२०२२) व अनुसूचित जमातीच्या महिला प्रवर्गासाठी ५ जानेवारी २०२३ पासून राखीव राहीले आहे. तेर ग्रामपंचायतीची निवडणूक दुसऱ्या टप्प्यात होणार आहे. निवडणुकीसाठी आणखी जवळपास ३० महिन्याचा अवधी आहे. पहिल्या टप्प्यात होणाऱ्या धाराशिव तालुक्यातील निम्म्याहून अधिक ग्रामपंचायत निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्या असल्याने त्या प्रवर्गातील इच्छूकांना आता पासूनच जोमाने कामाला सुरुवात करावी लागत आहे.

## वसंतराव काळे महाविद्यालयात जागतिक युवा कौशल्य दिन साजरा

आरंभ मराठी | पळसप

ढोकी येथील वसंतराव काळे महाविद्यालयामध्ये मंगळवारी (दि.१५) 'जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त 'करिअर संसद पदाधिकारी शपथ ग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य व उच्च तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, मुंबई व महाविद्यालयातील करियर कट्टा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास फेरे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून करिअर कट्ट्याचे समन्वयक प्राध्यापक डॉ माधव श्रीमंगले व प्राध्यापक डॉ ज्योती नाडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविके दरम्यान प्रा. डॉ.ज्योती नाडे यांनी या कार्यक्रमाचा उद्देश विशद करून विद्यार्थ्यांना यूपीएससी, एमपीएससी परीक्षेसाठी करिअर कट्ट्याची मौलिक मदत होऊन करिअर कट्ट्याच्या माध्यमातून आपला भविष्यकाळ निश्चितपणे उज्वल होऊ शकेल असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. तसेच प्रा. डॉ. माधव श्रीमंगले यांनी करिअर कट्टा योजनेच्या माध्यमातून आयएएस आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाच्या माध्यमातून करिअर कट्टा विभागाच्या कार्याची ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणा दरम्यान प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व करिअर कट्ट्याचे महत्त्व विशद केले. यावेळी करिअर संसदेच्या अंतर्गत निवडी करण्यात आल्या व शपथविधी कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी त्यांना नेमणूक पत्रे देण्यात आली व करिअर कट्टा दैनंदिनीचेही वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑनलाइन गेमचा जुगार खेळवून आर्थिक फसवणूक करणाऱ्या पाच जणांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | धाराशिव

ऑनलाईन गेमचा जुगार खेळवून आर्थिक फसवणुक करणाऱ्या पाच जणांवर सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. यातील आरोपी धाराशिव, बीड आणि नांदेड या तीन जिल्ह्यातील असल्यामुळे यामध्ये मोठी टोळी सक्रिय असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासंबंधी अधिक माहिती अशी की, आरोपी उत्तरेश्वर दामोदर इटकर (वय ४५ वर्षे, रा.सोनेसांगवी ता. केज जि. बीड), अस्लम दस्तगीर तांबोळी (वय ३२ रा. शेळका धानोरा ता. कळंब), सुरज घाडगे (रा. सातेफळ ता. केज), नामदेव कांबळे (रा. अंबेजोगाई जि. बीड) आणि एम.डी. पाटील (रा. नांदेड) या पाच जणांनी दिनांक १ जानेवारी २०२५ ते १५ जुलै २०२५ दरम्यान संगणमताने शासनाची बंदी असलेली बीडीजी ऑनलाईन गेम, दमन ऑनलाईन गेम व टी.सी. ऑनलाईन गेम या सारख्या ऑनलाईन गेमच्या लिंक व्हॉटसअॅपद्वारे लोकांना पाठवून त्यांना कमी पैशात अधिक पैसे जिंकण्याचे आमिष दाखवले. तसेच



त्यांनी ऑनलाईन गेमचा जुगार खेळवून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अनेक लोकांची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली. तसेच ऑनलाइन फसवणुकीचा त्यांचा खेळ आजही सुरू आहे. याप्रकरणी फिर्यादी सुरेश बापुराव कासुळे (सहा. पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे सायबर) यांनी दिनांक १५ जुलै रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव येथील सायबर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं.कलम ३१८ (४), ३ (५) सह कलम ६६ (सी), ६६ (डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम सह कलम १२ (अ) मुजुका अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## तुळजापूर तालुक्यात शिवसेनेच्या शाखांचे उद्घाटन ; निवडणुकीपूर्वी पक्षबांधणीस वेग

आरंभ मराठी | तुळजापूर

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीची चाहूल लागताच तुळजापूर तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या तीन नव्या शाखांचे उद्घाटन मोठ्या जल्लोषात पार पडले. मौजे सिंदफळ, कामठा व अपसिंगा या गावांमध्ये एकाच दिवशी पक्ष शाखांची स्थापना करण्यात आले असून ही तिन्ही गावे सिंदफळ जिल्हा परिषद गटात येतात. शिवसेनेचे पक्षप्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पक्ष सचिव संजय मोरे यांच्या आदेशानुसार तसेच धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा परिवहन मंत्री प्रताप



सरनाईक, उपनेते ज्ञानराज चौगुले, सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते, धाराशिव जिल्हाध्यक्ष मोहन पनुरे यांच्या मार्गदर्शनाखाली तर तालुकाध्यक्ष अमोल जाधव यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. या सर्व शाखांचे उद्घाटन सोहळा जिल्हाध्यक्ष मोहन पनूरे व तालुकाध्यक्ष अमोल जाधव यांच्या हस्ते पार पडले. यावेळी तिन्ही गावांतील ग्रामस्थ, युवक, महिला, नविन पदाधिकारी व शिवसेनेचे कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी युवा जिल्हाध्यक्ष गणेश जगताप,मीनाताई सोमाजी,रुपालीताई घाडगे,रेणूका शिंदे,राधा घोगरे,शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष गणेश नेपते,सोमनाथ घुट्टे,तुळजापूर शहर अध्यक्ष बापूसाहेब भोसले,शहर उपाध्यक्ष रमेश चिवचिवे,नितीन मस्के,शहाजी हाके यांची उपस्थिती होती.

### सिंदफळ जिल्हा परिषद गटाकडे सर्व पक्षाच्या नेत्यांचे लक्ष


शिवसेना शिंदे गटाकडून ज्या तीन गावात शाखा स्थापन करण्यात आल्या आहेत ही गावे सिंदफळ जिल्हा परिषद गटात येतात. या गटामध्ये दोन टर्म काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील हे निवडून आले आहेत. तुळजापूर शहराच्या जवळील हा गट असल्याने शहरातील अनेकजण या गटातून निवडणूक लढवण्यासाठी ईच्छुक आहेत. त्यामुळे या गटाकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष दिसून येत आहे.

## हरित धाराशिव उपक्रमाची प्रशासकीय तयारी पूर्ण

### पालकमंत्री सरनाईक यांच्यासह सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना सहभागाचे निमंत्रण

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक भव्य पाऊल उचलण्यात येत असून,'हरित धाराशिव' या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल १५ लाखांहून अधिक वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. सन २०२५ मध्ये एकूण ५० लाख वृक्षलागवडीचा संकल्प ठेवण्यात आला असून, यासाठी ग्रामपंचायती, नगरपालिका आणि नागरिकांनी वृक्ष लागवडीच्या मोहिमेत सहभागी होण्याची आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या अभियानाचा उद्देश केवळ वृक्षारोपण करणे नसून, भविष्याच्या दृष्टीने पर्यावरणपूरक, हरित आणि सशक्त धाराशिव घडवण्याचा संकल्प आहे 'हरित धाराशिव' उपक्रमाचे उद्घाटन उद्या शनिवारी (दि.१९) सकाळी १०.३० वाजता धाराशिव तालुक्यातील शिंगोली येथील राखीव वन येथे महाराष्ट्र परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील, धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, विधान परिषद आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे,



परंडाचे आ.प्रा.डॉ. तानाजी सावंत, कळंब-धाराशिवचे आमदार कैलास घाडगे पाटील, उमरगा लोहाऱ्याचे आमदार प्रवीण स्वामी यांच्यासह अभिनेते स्वप्नील जोशी उपस्थित राहणार आहेत. 'हरित धाराशिव' ही संकल्पना केवळ एकदिवसीय उपक्रम न राहता, पर्यावरण संवर्धनाचा दीर्घकालीन सामाजिक संदेश देणारा ठरावा, यासाठी जिल्हा प्रशासन विशेष प्रयत्नशील आहे. या उपक्रमातून जागतिक स्तरावर वृक्षलागवडीचा विक्रम करण्याचा मानस असून, धाराशिव जिल्ह्याची एक वेगळी हरित ओळख निर्माण करणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील ६२२ ग्रामपंचायती,सर्व नगरपालिका व नागरिकांना एकजुटीने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.'हरित धाराशिव' हा केवळ शासनाचा नव्हे,तर जनतेचा उपक्रम असल्यामुळे प्रत्येक नागरिकाचा सहभाग अनिवार्य असून, पर्यावरण समतोल राखण्यासाठी व भावी पिढ्यांना चांगले जीवन देण्यासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वाचे असल्याने यात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.